आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
३ डिसेंबर २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसलेल्यांच्या मदतीसाठी गेल्या आठवड्यात राज्य सरकारकडून केंद्राकडे मदतीची मागणी

- राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन ८ ते १४ डिसेंबरदरम्यान नागपुरात होणार

- पान मसाल्याच्या प्रत्येक पाकिटावर किंमत छापणं बंधनकारक, तंबाखूजन्य पदार्थांवर अतिरिक्त उत्पादन शुल्क लादणारं विधेयक लोकसभेत मंजूर

- राज्यातल्या चार दिव्यांगांचा राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव

**आणि**

- राष्ट्र सेवा दलाचे माजी अध्यक्ष दिवंगत पन्नालाल सुराणा यांचं देहदान

**<><><><><>**

राज्यात अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसलेल्यांच्या मदतीसाठी केंद्र सरकारला २७ नोव्हेंबरला प्रस्ताव पाठवला असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

अतिवृष्टीग्रस्तांच्या मदतीसाठी राज्य सरकारनं प्रस्तावच पाठवला नसल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. संसदेच्या तारांकित प्रश्नाच्या उत्तरात ही बाब उघड झाल्याचा दावाही विरोधकांकडून केला जात होता. त्यावर ते बोलत होते.

***होल्ड... बाईट- मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस***

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला ८ डिसेंबरपासून नागपूर इथं सुरूवात होणार आहे. मुंबईत विधानभवन इथं आज विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली, यात हा निर्णय झाला. हे अधिवेशन १४ डिसेंबरपर्यंत चालेल. १३ डिसेंबर, शनिवारी आणि १४ डिसेंबर, रविवारी शासकीय सुट्टीच्या दिवशीही सभागृहाचं कामकाज होणार आहे. विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस,

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषद सभापती राम शिंदे उपस्थित होते.

**<><><><><>**

पान मसाल्याच्या प्रत्येक लहान मोठ्या पाकीटावर किरकोळ विक्री किंमत लिहिणं आणि आवश्यक सूचना देणं केंद्र सरकारनं बंधनकारक केलं आहे. १ फेब्रुवारी पासून हे नियम लागू होतील. यापूर्वी १० ग्रॅम पेक्षा कमी आकाराच्या पाकिटावर किंमत लिहिणं बंधनकारक नव्हतं.

**<><><><><>**

तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांवर अतिरीक्त उत्पादन शुल्क लादण्याची तरतूद असलेलं विधेयक लोकसभेनं आज आवाजी मतदानानं मंजूर केलं. जीएसटीतला अधिभार रद्द झाल्यावर हे शुल्क लागू होणार आहे. तंबाखू, सिगारेट, सिगार, हुक्का, जर्दा, सुगंधी तंबाखू यासारख्या गोष्टींवर हे अतिरीक्त उत्पादन शुल्क लागू होईल. सध्या या वस्तूंवर २८ टक्के जीएसटी लागू होतो. या विधेयकातल्या तरतुदीमुळे सिगारेटवर पावणे तीन ते ११ रुपयांचं आणि तंबाखूवर किलोमागं शंभर रुपयांचं उत्पादन शुल्क लागण्याची शक्यता आहे.

जीएसटी अधिभार कमी झाल्यानं कमी होऊ शकणाऱ्या किंमती, या अधिभारामुळं कायम राहतील अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. नागरिकांनी या वस्तूंचा उपयोग कमी करावा यासाठी हे शुल्क लादलं जात असल्याचं त्या या विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना म्हणाल्या.

**<><><><><>**

संचार साथी या मोबाईल ॲप वाढता विरोध पाहून सरकारनं मोबाईल उत्पादकांसाठी हे अॅप प्री-इंस्टॉल करणं अनिवार्य नाही असं स्पष्ट केलं आहे. याविषयी अधिक माहिती ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड... व्हॉईस कास्ट**

*(संचार साथी या ॲपमुळे खासगी आयुष्यात ढवळाढवळ होण्याचा किंवा नागरिकांवर लक्ष ठेवण्याचा कोणताही धोका निर्माण होत नसल्याचं स्पष्टीकरण सरकारनं दिलं आहे. हे ॲप वापरताना दिलेल्या परवानगी ॲपची नोंदणी करणे, नोंदणीसाठी ओटीपी पाठवणे, मोबाइलच्या IMEI ची तपासणी यासाठी वापरल्या जातील. इतर काहीही उद्देश यामागे*

*नसल्याचा खुलासा सरकारनं केला आहे. उलट, यामुळे फसवणुकीचे प्रकार टाळणं, हरवलेला किंवा चोरीला गेलेला फोन ब्लॉक करणं, आपल्या नावावरची मोबाईल कनेक्शन तपासून अनधिकृत कनेक्शन रिपोर्ट करणं, मोबाईल हँडसेट खरा आहे किंवा नाही, हे तपासणं इत्यादी गोष्टी करणं नागरिकांना सोपं होईल, असं सरकारनं म्हटलं आहे. आतापर्यंत १ कोटी ४० लाख वापरकर्त्यांनी हे ॲप डाऊनलोड केलं आहे. या माध्यमातून २६ लाख चोरीला गेलेले, हरवलेले मोबाइल हँडसेट लक्षात आले आणि त्यापैकी सव्वा ७ लाख मोबाइल सापडले. सुमारे पावणे ५ शे कोटी रुपयांचे गैरव्यवहारही थांबवण्यात यातून यश आलं, अशी माहिती सरकारनं दिली आहे.)*

**<><><><>**

नियमांचं उल्लंघन करून बेकायदेशीररीत्या प्रवासी वाहतूक केल्याबद्दल रॅपिडो या ॲप आधारित कंपनीविरोधात मुंबईतील घाटकोपर इथं गुन्हा दाखल झाला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी हे निर्देश दिले होते. चालकांना नियमावली आणि प्रवासी सुरक्षिततेविषयी प्रशिक्षण न देता त्यांची नियुक्ती करण्यात येत असल्याचं उघड झालं आहे. यासंदर्भातल्या तक्रारींची दखल घेऊन हा गुन्हा दाखल झाला आहे.

**<><><><>**

मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणातली संशयित शीतल तेजवानी हिला पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनं अटक केल्याची माहिती पोलीस सहआयुक्त रंजन कुमार शर्मा यांनी दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील यांच्या कंपनीला पुण्याच्या मुंढवा भागातली ही जमीन ३०० कोटी रुपयांना विकण्यासंदर्भातल्या व्यवहाराशी शीतल तेजवानी यांचा संबंध आहे.

**<><><><>**

ज्या समाजात दिव्यांग व्यक्तींना समतेची वागणूक दिली जाते, त्याच समाजाला खऱ्या अर्थानं विकसित म्हणता येईल, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. दिव्यांग सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. राज्यातल्या पुरस्कार विजेत्यांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

\- **- होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(राज्यातल्या अबोली जरीत, भाग्यश्री नडीमेताला, धृती रांका आणि देवांगी दलाल या चौघांना या कार्यक्रमात राष्ट्रपतींनी सन्मानित केलं.* ***अबोली जरीत*** *यांनी जन्मतः ८० टक्के अपंगत्वावर मात करून भारतातल्या पहिल्या व्हीलचेअर मॉडेल म्हणून नावलौकिक मिळवला. श्रवणदोषासह जन्मलेल्या* ***भाग्यश्री नडीमेताला*** *यांनी कला आणि व्यावसायिक शिक्षिका म्हणून काम करताना ५००पेक्षा जास्त दिव्यांग विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं. दोघींना सर्वश्रेष्ठ दिव्यांगजन या विभागात पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. पुण्याची* ***धृती रांका*** *हिला जन्मतःच डाऊन सिंड्रोम आहे. तिनं आपल्या चित्रांच्या आणि कलाकृतींच्या माध्यमातून आपला आवाज शोधला आणि एक स्टार्टअप तिच्या कलाकृतींमधून उपयोगी वस्तू तयार करतो. धृती हिला श्रेष्ठ दिव्यांग बालिका विभागात पुरस्कार मिळाला. तर श्रवणदोष असलेल्या मुलांसाठी जोश फाऊंडेशनच्या माध्यमातून काम करणाऱ्या ऑडिऑलॉजिस्ट, लेखिका देवांगी दलाल यांना सर्वश्रेष्ठ व्यक्ती म्हणून गौरवण्यात आलं.)*

**<><><><><>**

रायपूर इथं सुरू असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात, भारतानं दक्षिण आफ्रिकेपुढं विजयासाठी ३५९ धावांचं आव्हान ठेवलं आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. भारतानं निर्धारित षटकात ५ गडी गमावून ३५८ धावा केल्या. त्यात विराट कोहली आणि ऋतुराज गायकवाड या शतकवीरांचा मोलाचा वाटा आहे. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी १९५ धावांची भागिदारी केली. कोहलीनं १०२, तर ऋतुराजनं १०५ धावा केल्या.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या १७ षटकात १ बाद ९७ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

राष्ट्र सेवा दलाचे माजी अध्यक्ष पन्नालाल सुराणा याचं काल निधन झालं. ते ९३ वर्षांचे होते. त्यांच्या अंतिम इच्छेनुसार त्यांचं आज देहदान करण्यात आलं. पन्नालाल सुराणा हे दैनिक मराठवाडा या वृत्तपत्राचे माजी संपादक होते. ग्रामोदय समिती कुर्डवाडीचं अध्यक्षपदही त्यांनी भूषवलं होतं. दुष्काळ निवारण, शेतकरी-शेतमजुरांच्या हक्कासाठी त्यांनी आंदोलने केली. समाजवादी विचारवंत, साहित्यिक आणि उत्तम वक्ता अशीही त्यांची

ख्याती होती. १९९३ सालच्या भूकंपानंतर त्यानी नळदुर्ग गावात ‘आपलं घर’ नावाचा मोठा प्रकल्पही उभारला होता.

<><><><><>

डॉलरच्या तुलनेत रुपयानं विनिमय दरात आज पहिल्यांदाच ९० रुपयांची पातळी ओलांडली. दिवसअखेर एक डॉलरचा विनिमय दर २५ पैशांनी घसरुन ९० रुपये २१ पैशांवर या विक्रमी निचांकी पातळीवर स्थिरावला.

<><><><><>

गेल्या २४ तासात उत्तर कोकण, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात किमान तापमानात किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//